# नियमित दिवाणी मुकदमा क्र.७/२०२० मधील
# निशाणी क्र.२४ वर आदेश

**CNRNO.MHLA110002012020**

०१. सदरचा अर्ज प्रतिवादीने विनाकैफीयतीचा आदेश रद्द करुन कैफीयत व म्हणणे स्विकारण्याकरिता दाखल केलेला आहे. सदर अर्जातील थोडक्यात कथन असे आहे की, दाव्याचे समन्स त्यांना कोरोना काळात बजावलेले असून प्रस्तुत प्रतिवादी यांनी कोव्हीड–१९ काळात मुदतीमध्ये कैफियत व म्हणणे दाखल करु शकले नाहीत. त्यामुळे सदर प्रतिवादीला कैफियत व म्हणणे दाखल करण्यास परवानगी देण्याची सदर प्रतिवादी क्र.२ व ३ यांनी विनंती केली आहे.

०२. सदर अर्जास वादीने म्हणणे दाखल करून विरोध दर्शविलेला आहे.

०३. सदर प्रकरणातील कागदपत्रांच्या अवलोकनावरुन स्पष्ट होते की, सदर प्रतिवादीला दि.१७/०७/२०२० रोजी समन्सची बजावणी झालेली आहे. परंतु सदर प्रतिवादी क्र.२ व ३ यांनी मुदतीत न्यायालयात हजर राहून कैफियत व म्हणणे दाखल केलेले नाही. तसेच मार्च २०२० पासून कोव्हीड–१९ या संसर्गजन्य आजारामुळे न्यायालयीन कामकाजावर देखील परिणाम झालेले होते. त्यादरम्यानच्या न्यायालयीन कामकाजाबाबत मा. सर्वोच्च न्यायालय व मा. उच्च न्यायालयाकडून वेळोवेळी दिशानिर्देश प्राप्त झालेले होते. त्यामुळे अर्जात नमूद केलेले कारण व कोव्हीड–१९ या संसर्गजन्य आजारामुळे उत्पन्न झालेली परिस्थिती विचारात घेऊन माझे असे मत झाले आहे की, पक्षकारांमधील वादाचे कायमस्वरुपी निराकरण होण्याकरीता प्रतिवादीला बचाव मांडण्याची संधी देणे न्यायोचीत होणार आहे. त्यामुळे अर्जात नमूद कारण,

पक्षकारांमधील वादाचे स्वरुप व नैसर्गिक न्यायाचे तत्व विचारात घेऊन माझे असे मत झाले आहे की, सदरचा अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे. सबब मी शेवटी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**<u>आ दे श</u>**

नि.क्र.२४ वरील अर्ज मंजूर करण्यात येतो व प्रतिवादी क्र. २व ३ यांच्यिा विरुध्द झालेला विना कैफीयत आदेश रद्द करण्यात येतो.

(के. एस. सुर्यवंशी)

दि.०५.१०.२०२१ दिवाणी न्यायाधीश व. स्तर निलंगा.